
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार''

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.





श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) कोल्हापूर.

**विषय :**

## सातवाहन सम्राट वासिष्टीपुत्र पुळूमावी याचा नाशिक लेखाचा अभ्यास

**संशोधकांचे नाव :**


कु. ऋषिकेश संजय पोवार. (TYBA) History

कु. विनय विलास पोवार. (TYBA) History


**इतिहास विभाग : सन २०१८-१९**

डॉ. मंजुश्री घोरपडे.

डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. प्रतिज्ञापत्र | १ |
| २. प्रस्तावना | २ |
| ३. उद्दिष्ट्ये | ३ |
| ४. गृहितके | ४ |
| ५. प्रास्ताविक–लिपी | ५ |
| ६. वर्णव्यवस्था–भाषा | ६ |
| ७. स्थलनिर्देश | ७ |
| ८. कालनिर्देश–विषय | ८ |
| ९. ऐतिहासिक महत्व | ९ |
| १०. संदर्भ साधने | १० |
| ११. प्रमाणपत्र | ११ |


ESTD JUNE 1964

# प्रतिज्ञापत्र

आम्ही बी.ए. भाग ३ मधील इतिहास विभागातील विद्यार्थी ‘‘सातवाहन सम्राट वासिष्टीपुत्र पुळूमावी याचा नाशिक लेखाचा अभ्यास’’ या विषया वरीलपुढील प्रकल्प अहवाल सादर करत आहे.

या प्रकल्पात सातवाहन राजा पुळूमावी याच्या नाशिक येथील तिसऱ्या गुंफेच्या प्रवेशद्वारावर कोरलेल्या लेखाचा अभ्यास करून तसेच याचा आढावा या प्रकल्पात सादर करण्याचा प्रयत्न करत आहे.

तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातुन प्राचीनकालीन शिलालेखांची माहिती संदर्भ ग्रथांच्या आधारे देण्याचा प्रयत्न करत आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रस्तावना

शिलालेख आणि ताम्रपट ही प्राचीन इतिहास लेखनाची अस्सल साधने आहेत. त्याच्या आधारे प्राचिन लिपी, भाषा, राजकिय परिस्थीती, समाज, धर्म, वाङ्मय इ. गोष्टींची ज्ञान मिळते. सातवाहन राजा पुळूमावी याचाहा लेख नाशिक येथील तिसऱ्या गुंफेच्या प्रवेशद्वारावर कोरला आहे. महाराष्ट्रातील काही आद्य प्रस्तर लेखन पैकी असल्यामुळे तो अतिशय महत्वपुर्ण आहे. या मध्ये गौतमी पुत्र सातकरर्णी याच्या पराक्रमाची वर्णन असल्याने ततकालिन राजकिय परिस्थीतीची तर आकलन होतेच परंतू सातवाहन कुलाचीही अधिक माहिती मिळते. सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचाही प्रस्तुत लेखावरून यथातथ्य पडताळता येते.

COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
(Autonomous)

# उद्दिष्टये

१. सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याच्या लेखांचा अभ्यास करणे

२. या लेखावरून सामाजिक, आर्थिक, राजकिय जिवनाचा माहीतीचा अभ्यास करणे.

३. सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याच्या भाषा व लेपीचा अभ्यास करणे.

४. ऐतिहासीक लिखीत साधणे म्हणून ती समजावून घेणे.

५. धर्म तत्वाच्या प्रसाराचा अभ्यास करणे.

ESTD JUNE 1964 ... COLLEGE KOLHAPUR

# गृहितके

१. गौतमीपुत्र सातकर्णी याचे साम्राज्य विशाल होते.

२. गौतमीपुत्र सातकर्णी यांची विजयी पतका पराजीत झालेली नाही.

३. ही गुंफा मट्रावनीय पंथाच्या भिक्षुसंघास दान केलेली आहे..

४. या लेखातून गौतमीपुत्र सातकर्णी हा प्रजाजनांच्या सुख–द:खाशी समास होता हे समजले.

५. हा लेख दुसऱ्या शतकात लिहील्यामुळे त्या काळातील सामाजिक आर्थिक, राजकीय जीवन समजले.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous) ...PUR

# सातवाहन सम्राट वासिष्टीपुत्र पुळूमावी याचा नाशिक लेख

**प्रास्ताविक :**

सातवाहन राजा पुळूमावी याचा हा लेख नाशिक येथील तिसऱ्या गुंफेच्या प्रवेशद्वारावर शलालेख आणि ताम्रपट ही प्राचीन इतिहास लेखनाची अस्सल साधने आहेत. त्याच्या आधारे प्राचिन लिपी, भाषा, राजकिय परिस्थीती, समाज, धर्म, वाङ्मय इ. गोष्टींची ज्ञान मिळते. सातवाहन राजा पुळूमावी याचाहा लेख नाशिक येथील तिसऱ्या गुंफेच्या प्रवेशद्वारावर कोरला आहे. महाराष्ट्रातील काही आद्य प्रस्तर लेखन पैकी असल्यामुळे तो अतिशय महत्वपुर्ण आहे. या मध्ये गौतमी पुत्र सातकरर्णी याच्या पराक्रमाची वर्णन असल्याने ततकालिन राजकिय परिस्थीतीची तर आकलन होतेच परंतू सातवाहन कुलाचीही अधिक माहिती मिळते. सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचाही प्रस्तुत लेखावरून यथातथ्य पडताळता येते.

**लिपी :**

हा लेख दुसऱ्या शतकाच्या प्रथमर्धातील ब्राम्ही लिपीमध्ये लिहीला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## वर्णव्यवस्था

या लिपीवर शत्रप लिपीचा प्रभाव पडलेला आढळतो गोलाकार या अक्षरांना कोन प्राप्त झाले असुन कोन युक्त अक्षरांना गोल प्राप्त झाला आहे. डावीकडे वळलेला ''क'' आणि ''र'' चा दंड लिपीचे दक्षिणात्य स्वरूप सुचित करतात. ''ग'' हे अक्षर गोलाकार आहे. ''घ'' या अक्षरातील तिनीही दंड परस्परांशी समांतर असून समान उंचीचे आहे. 'प','म', 'ल','ब', 'ह', या अक्षरांच्या बैठकी बसकट आहेत.

## भाषा :

या प्रस्तलेखाची भाषा प्राकृत असून त्यावर संस्कृत भाषेची छाप आहे. संबध लेखन पहिल्या ओळी पासून नवव्या ओळी पर्यंत गौतम पुत्र सातकर्णीचे वर्णन आहे. ते विशेष युक्त व सामासिक आहे. हि गोष्ट अर्थातच संस्कृतचा प्रभाव असल्याने स्पष्ट करते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## स्थलनिर्देश

या गौतमीपुत्र सातकर्णी  या राजाने निरनिराळे देश व्यापले. त्या देशांची नावे या लेखात आले असून त्या बरोबरच काही पर्वतराजींचीही नावे आली आहेत.

## देशांची नावे :

ऋषिक : खानदेश अश्मक–गोदावरी नदीवरील प्रदेश

मुळक : सध्याचा पैठण भोवतालचा प्रदेश

सुरठ : दक्षिण काठेवाड, कुकुर– उत्तर काठेवाड.

अपरान्त : उत्तर कोकण. आकार–माळव्याचा पुर्व भाग.

अवन्ती : माळव्याचा पश्चिम भाग.

अनूप : मध्यप्रदेशातील नेमाड जिल्हा.

विदर्भ : सध्याचा विदर्भ.

## पर्वतांची नावे :

विंध्य : सध्याचा विंध्य ऋक्षवत– अरवलीच्या रांगा.

परिचात् : विंध्य पर्वताच्या पश्चिमेच्या रांगा.

सह्य : सह्याद्री, कण्हगिरी–कान्हेरी.

मलय : निलगीरी पर्वत, महेन्द्र–पुर्वघाट.

तिरण्हू : नाशिक जवळील सह्याद्रीचा डोंगर

VIVEKANAND COLLEGE (Autonomous) ESTD JUNE 1964


## कालनिर्देश

या पहिल्या ओळीत पुळूमावीचे राज्य वर्ष १९, ग्रीश्म ऋतु, द्वितीय पक्ष, त्रयोदशी असा कालनिर्देश आहे. लेखात २, ३,९,१० या अंकाच्या खुना आल्या आहेत. यातील ग्रीश्म ऋतूचा उल्लेख विशेष आहेत. मथुरेच्या कुषानांच्या लेखात ऋतूंचा उल्लेख येतो. महाराष्ट्रामध्ये ऋतूचा उल्लेख वासिष्टी पुत्र पुळुमावीच्या या लेखात प्रथम आला.

## विषय :

प्रस्तूत लेख गौतमीपुत्र सतकर्णी चा पुत्र वासिष्टीपुत्र पुळूमावीयाच्या कारकीर्दीच्या १९व्या वर्षी कोरला आहे. लेखामध्ये प्रत्यक्ष प्रशस्ती गौतमी पुत्र सातकर्णीचे आहे. त्याची माता गौतमीबलश्री हीने गुहा कोरवीली. प्रत्यक्ष लेख वासिष्टी पुत्र पुळूमावीच्या कारकिर्दीत कोरला म्हणून त्यास वासिष्ट पुत्र पुळूमावीचा लेख म्हणतात. गौतमीपुत्र सातकर्णी याची सत्यवादीनी तपस्वीनी माता गौतमीबलश्री हिने कैलास पर्वता समान असलेल्या तिरण्हू पर्वतावर भद्रावनीय भिक्षूसंघासाठी स्वर्गीय गूहा खोदवीली तिच्यामध्ये चित्राकृती रेखण्यासाठी व संघाच्या निर्वाहासाठी तिरण्हू पर्वताच्या नैऋत्येस आलेले पिसाजीपद्रक हे गाव दान दिले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



सातवाहनसम्राट वासिष्ठिपुत्र पुळुमावि याचा नाशिक गुहालेख.

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## ऐतिहासिक महत्व

या लेखात गौतमीपुत्र सातकर्णी याने पादाक्रांत केलेल्या देशांची यादी आहे. या यादीवरून त्याच्या राज्यविस्ताराची आपणांस कल्पना येते. त्यांच्या पराक्रमाची या लेखात गाथाच आहे. त्याच्या सदगुण समुच्चयाचीही लेखात नोंद आहे. राजा हिमालय, मेरू मंदार पर्वतांन प्रमाणे बलशाली होता. ऋषिक, अश्मक, मुलक, सुराष्ट्र, कुक्कुर, अपरान्त, अनुप, विदर्भ आणि आकर, अवन्तीचा तो सम्राट होता. विध्य ऋक्षवत, परियात्र, सह्य, कृष्णशैल, मलय, महेद्र, सेटगिरी, आणि चकोर या पर्वत राजी गौतमीपुत्र सातकर्णीच्या सामराज्यात होत्या. त्याचे मुखकमल सुर्यकमलाप्रमाणे तेजस्वी होते. त्याचे बाहुद्वय स्नायुपूर्ण, गोलाकार असून सर्वाप्रमाणे सडसडीत होते. तो मातृभक्त असून त्रीऋणाच्या परीपुर्तीसाठी तो झटत असे दानप्रदानामुळे, त्याचाहा सदैव ओला होई. प्रजेच्या सुखदु:खा मध्ये तो सहभागी होता. त्याने क्षत्रियांचा दर्प उतरविला असून शक, यवन, पह्लव आणि क्षहराताचे त्याने उच्चाटन केले. तो स्वत:ला एक ब्राम्हण म्हणवितो. प्रस्तूत लेखामध्ये गौतमीपुत्र सातकर्णीची तुलना राम, कृष्ण, अर्जुन, भिम, नाभाग, नहूश, जनमेजय, ययाती, परशूराम, आणि अंबरिश या पुरुषश्रेष्ठांशी केली आहे. यातील अतिशयोक्त विभाग सोडला तरी सातवाहन कुलाची प्रतिष्ठापना करणाऱ्या या पुरूषश्रेष्ठाचे असामान्य कर्तृत्व निर्विवाद सिध्द होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# सातवाहन सम्राट वासिष्ठीपुत्र पुळुमावि याचा नाशिक लेख वाचन

ओळ १ ओळ सिद्ध (।।) रञो वासिठीपुतस सिरी पुळुमायिस सवछरे एकुन–वीसे १० (+) ९ गीम्हाणं पखे बितीये २ दिवसे तेरसे १० (+)३ राजरञो गोतमीपुतस हिमव (त) मेरु

ओळ २ मंदर–पवत–सम–सारस–असिक–असक–मुळक–सुरठ कुकुरापरंत–अनुप–विदर्भ–आकरावंति–राजस–विझ–छवत परिचात–सम्ह (झ)–कण्हगिरी–मचसिरी–टन–मलय–महिद–

ओळ ३ सेटागिरी–चकार–पर्वत–पतिस सवराज (लोक)म(ं) डल पतिगहीत–सासनस दिवसकर (क) र–विबोधित–कमलविमल–सदिस–वदनस तिसमुद–तोय–पीत–वाहनस पटिपू (ं) णंचद–मंडल–ससिरीक–

ओळ ४ पियदसनस वर–वारण–निकम–चारु–विकमस भुजगपति–भोग–पीन–वाट–विपुल –दिघ–सुद(र) भुजस अभयोदक –दान– किलीन –निभय–करस अविपन–मातु–सुसूसाकस सुविभत– तिवग–देस–कालस.

ओळ ५ पोरजन–निविसेस–सम–सुख–दुखस खतिय–दप–मान मदनस सक–यवन–पहव निसुदनस धमोपजित कर विनीयोग–करस कितीपराधे पि सतुजने अ–पाण–हिसा –रूचिस दिजावर–कुटूंब विविध–

ओळ ६ नस खखरात वस –निरवेस–करस–सातवाहनकुल यस पतिथापन–करस सव मंडलाभीवादित–च(र) णस विनीवतीत–चातूवण–संकरस अनेक–समरावजीत–सतुसधस अपराजित– विजयपताक– सतुजन–दुपधसनीय–


ओळ ७ नस पुरवरस कुल–परिस–परपंरागत–विपूल राजसदन आगमान(नि) लयस सपुरिसानं असयस सिरी(ये) अधिठानस उपचारान पभवस एककुसस एकधनुधरस एकसूरस एक बम्हणस राम–

ओळ ८ केसवाजून–भीमसेन–तुल परकमस छणधनुसव –समाज कारकस नाभाग–नहुस–जनमेजय–सकर–य(या) ति रामा –वरीस –सम–तेजस अपरीमितमखयमचितमभुत पवन–गरूड–सिध–यरव–राखस–विजाधर–भूत–गधव–चारण–

ओळ ९ चद–दिवाकर–नखत–गह–विचित्र–समरसिरसि जितरिपु–सघस नागवर–रवधा गगनत लमभिविगाढस कुल–विपु)(लस) रि करस सिरी–सातकणिस मातुय महादेवीय गोतमीय बलसिरीय सचवचन–दान–खमाहिसा–निरताय तप–दम–निग्र

ओळ १० चमोपवास–तपराय राजरिसिवधु–सदमखिलमनु विधीयमानाय कारित देयधम (केलासपवत) सिखर–सदिसे (ति) रण्हु–पवत–सिखरे विम(ान)वर–निविसेस–महिढीकं लेण () एत चलेण महादेवी महाराज–मात महाराज (पि) तामही ददाति निकायस भदावनीयान भिखु–सघस(ा)

ESTD
JUNE
1964
(Autonomous)



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD
JUNE
1964

# भाषान्तर

जय-वासिष्टी पुत्र राजा श्री पुळूमावि याच्या एकोणिसाव्या वर्षातील ग्रीष्मऋतुतील द्वितीय पक्षातील त्रयोदशीस, हिमालय-मेरू

मंदार पर्वतसहृश शक्तिमान, असिक-असक-मुळक-सुरथ-कुकुर-अपरान्त-अनुप-विदर्भ-आकरावन्ती(यांचा) राजा, विंध्य-ऋक्षवत्-परियास-सह्य-कण्हगिरी-मलय-महेन्द्र.

श्वेतगिरी-चकोर या पर्वत प्रदेशांचा अधिपती, सर्व राज्यमंडळ्यांनी ज्याचे शासन मान्य केले आहे. ज्योचे मुखमंडळ सुर्य किरणांनी प्रफुल्लित केलेल्या कमळाप्रमाने सुंदर व निर्मख आहे-ज्याच्या अश्वांनी तीन समुद्रांचे पाणी प्याले- आहे.

ज्याचे मुख पुर्णचंद्र बिंबाप्रमाणे सुंदर व शोभायमान आहे गजश्रेष्ठाच्या गतीप्रमाणे ज्याचे चालणे मनोहर आहे-ज्याचे बाहु सर्पराजाच्या आकृतीप्रमाणे पुष्ट, वर्तुळाकार व लांब रूंद आहेत-ज्याचा निर्भय हात अभयोदकदानाचे सिंचनाने आर्द्र झाला आहे-ज्याने आपल्या मातेची अविरत शुश्रुषा केली आहे. तीन पुरुषार्थीचा साधनेप्रीत्यर्थ ज्याने देश कालाची य्थायोग्य विभागणी केली आहे.

प्रजाजनांच्या सुखदु:खाशी जो पुर्ण समरस झाला आहे-ज्याने क्षत्रियांच्या अभिमान -गर्वाचे हरण केले आहे. ज्याने शक-यवन- पहव-यांचा नि:पात केला आहे -ज्याने धर्मास अनुसरून कर बसवून त्याचा विनीयोग केला आहे. अपराधी शत्रूच्या विरूध्द सुध्दा जो हिंसाचार करीत नाही ज्याने

व्दिज व व्दिजेतर कुंटूबांचे पालन केले आहे-ज्याने खखरात वंशाचा समुळ आहे. सर्व प्रदेशांनी ज्याचे चरणास अभिवादन केले आहे -ज्याने चातुर्वर्णाचा संकर थांबविला आहे,

ज्याने अनेक युध्दे करून शत्रुसंघांचा पराभव केला आहे -ज्याची विजय पताका पराजित झाली नाही -ज्याचे राजधानीस शुत्रंकडून उपसर्ग पोचला नाही-कुलपुरुषाकडून परंपरेने ज्याला पुष्कळ राजबिरूदे प्राप्त झाली आहेत-जो विद्यानीधी आहे, जो सज्ञनांचा आश्रयदाता आहे-जो लक्ष्मीचे निवासस्थान आहे-जो सदाचाराचे उगमस्थान आहे जो एकमेव नियंता आहे-धनुर्धर आहे-शुर आहे-ब्राम्हण आहे राम

कृष्ण , अर्जुन-भीमसेन यांचे बरोबरीचा ज्याचा पराक्रम आहे सण, ऊत्सव- प्रसंगी मेळावा भरविणारा जो नाभाग नहुष, जनमेजय सगर, ययती, राम, अंबरीष यांचे प्रमाणे तेजस्वी आहे. ज्याने पवन, गरूड, सिध्द

यक्ष, राक्षस, वद्याधर, भुत, गंधर्व, चारण, चंद्र, सुर्य, नक्षत्र, ग्रह, यांनी व्याप्त असलेल्या विशाल, अनंत, अचित्य, अग्द्रुत- अंतिरिक्षांत विहार करावा तसा हत्तीवर आरूढ होऊन शत्रूसंघांचा युध्दात पराभव केला ज्याने आपल्या कुलाचे वैभव वाढविले अशा श्री सातकर्णीची माता महादेवी गौतमीबलश्री जी सत्यभाषणी, दानशूर, क्षमाशील असून.

तप, दम, नियम, आणि उपवास आचरुन राजर्षी-पत्नी हा शब्द जिने सार्थ केला आहे (तिने) पुण्यकर्म म्हणून कैलास पर्वताच्या शिखराप्रमाणे शिखर असलेल्या त्रिरश्मीपर्वत शिखरावर दिव्य विमानाप्रमाणे शोभिवंत असणारे लेणे करविले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# संदर्भ साधने


१) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या व्दितीय आवृती, कॉन्टिनोन्टल प्रकाश.

२) Burgress and pandit, Indraji Inscriptions Form the cave Temples of western India.

३) Nagarajus-Buddhist Arechirecture of western India agam kala Prakashan, N. Delhi1981.

४) ओझा गौरीशंकर- प्राचीन भारतीय लिपीमाला मुन्शीराम मनोहरलाल, नवी दिल्ली, १९९७,

५) कोलते वि.भी (संपा) - महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ पुणे १९८७.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रमाणपत्र

कु. ऋषिकेश संजय पोवार. व कु. विनय विलास पोवार यांनी **TYBA** विभागातील **History** विषयासाठी सादर केलेल्या प्रकल्प हा सातवाहन सम्राट वासिष्ठीपुत्र पुळूमावी याचा नाशिक लेखाचा अभ्यास हा माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला आहे.

मार्गदर्शक :

डॉ. मंजुश्री घोरपडे.

डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी.

for HOD
विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
वेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)